प्र. ११

# परिचलन पद्धतीनुसार प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे, पिंपरी-चिंचवड व बारामती यांची संयुक्त बैठक क्रमांक 48 दिनांक 14.05.2020

मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 62(3) मधील तरतुदीनुसार परिचलन पद्धतीने ठराव सादर करणे.

विषय:- पुणे शहर व जिल्ह्यातील रुग्णवाहिकांचे दरपत्रक ठरविणेबाबत.

कोविड 19 च्या अनुषंगाने प्रसार रोखणे व प्रतिबंधात्मक उपाय योजनांकरिता, वायूवेग पथकामार्फत, रुग्णवाहिका मागणी नुसार तात्काळ अधिग्रहण करून उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. रुग्णवाहिका सेवा 24 तास उपलब्ध करून देण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी कार्यालयाकडून सूचना प्राप्त आहेत. रुग्णवाहिकांचे आवश्यकतेनुसार तात्काळ अधिग्रहण करून रुग्णवाहिका जिल्हाधिकारी कार्यालयाच्या ताब्यात देण्यात येत आहेत. पुणे कार्यालयाने रुग्णवाहिका मालकांना नोटिस जारी केल्या आहेत. रुग्णवाहिका अधिग्रहीत करून महानगरपालिका यांचेकडे सुपूर्द केल्या आहेत. **सद्यस्थितीत लागु असलेले दर हे किमान 6 ते 7 वर्षापूर्वीचे आहे. सबब त्यामध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे.**

सदर दर हे किलोमिटर व तासांकरीता आहेत. त्यानंतर मागील काळात इंधन व इतर खर्चा मध्ये वाढ झाली आहे. सद्य स्थितीत रुग्णवाहिका पूर्णवेळ आवश्यक असल्यामूळे जुन्या दरपत्रकानुसार दर देणे उचित ठरणार नाही. प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे, नाशिक,नागपूर आणि मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र | प्रादेशिक परिवहन प्राधिकरण | वाहनाचा प्रकार व भाडेदर रुपया मध्ये (25कि.मी. अथवा 2 तासाकरिता तसेच प्रति कि.मी. भाडेदर) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | मारुती व्हॅन | टाटा सुमो व मेटॅडोर सदृष्य कपनीने बांधणी केलेली वाहने | टाटा 407 स्वराज माझदा आदीच्या साटयावर बांधणी केलेली वाहने | अद्यावत वाहने |
| 1 | पुणे<br>ठराव दि. 21.08.2013 | 250/-<br>9/- | 300/-<br>10/- | 500/-<br>12/- | 700/-<br>20/- |
| 2 | नाशिक | 300/-<br>9/- | 400/-<br>10/- | 500/-<br>11/- | (वातानुकुलित वाहने) नमुद दराच्या 10% जास्त |
| 3 | नागपूर (शहर) | 400/-<br>9/- | 450/-<br>10/- | 600/-<br>13/- | नमुद दरात 10% वाढ |
| 4 | मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण<br>ठराव दि. 04.04.2014 | 500/-<br>10/- | 600/-<br>10/- | 700/-<br>14/- | 850/<br>17/- |

टिप : मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण यांनी प्रत्येक प्रतीक्षा तासाला रुपये 50/- प्रति तास भाडे विहित केले आहे.

सदर ठराव हे किमान 6 ते 7 वर्ष पूर्वीचे असून वर्तमानकाळातील कोरोनाची साथ ध्यानात घेता ॲम्ब्यूलन्स सेवांची मागणी व जोखिम अत्यंतिक वाढलेली आहे. या कालावधीत वाढलेली महागाई तसेच भविष्य ध्यानात घेता या दरात सुधारणा करणे आवश्यक बनलेले आहे. शिवाय मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणचे धर्तीवर पुणे महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाची झालेली स्थापना ध्यानात घेता सदरचे दर ॲम्ब्यूलन्सधारक व ग्राहक यांचे व्यापक व संतुलित हीत ध्यानात घेऊन निश्चित करणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर मोटार वाहन कायदा व त्यातील तरतुदीनुसार , वरील तक्त्यच्या आभ्यासानूसार, रुग्णवाहिका करिता खालील प्रमाणे दर सुचित/ प्रस्तावित करण्यात येत आहेत.

Scanned with CamScanner

(दर रुपयामध्ये)

| 1 | 2 | 3 | 4 | 5 |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | रुग्णवाहिका प्रकार | दर 25 कि.मी. अथवा 2 तास | दर प्रती कि .मी.साठी | प्रती प्रतिक्षा तास |
| 1 | मारुती | 500/- | 11/- | 100/- |
| 2 | टाटा सुमो/ माटॉडौर इत्यादी सदृश कंपनीने बांधणी केलेली रुग्णवाहिका | 600/- | 12/- | 125/- |
| 3 | टाटा 407 / स्वराज माझदा इत्यादी सदृश चासीज वर बांधणी केलेली रुग्णवाहिका | 900/- | 13/- | 150/- |

अटी व शर्ती

1. वरील भाडे दर फक्त प्रादेशिक परिवहन प्राधिकरण पुणे, पिंपरी चिंचवड आणि बारामतीच्या कार्यक्षेत्रामध्ये लागू आहेत
2. वरील भाडे दर रुग्णवाहिकेत रुग्ण बसल्यापासुन परतीच्या अंतरासाठी आहेत. परतीसाठी रकाना 4 नुसार भाडे लागू राहिल.
3. 25 कि.मी. च्या पुढे अंतर गेल्यास त्या मुळ भाड्यात प्रती की.मी. वाढवून एकुण भाडे ठरेल. (रकाना 4 चे अवलोकन करावे)
4. सदरचे दर पत्रक रुग्णवाहिकेत आतील बाजूस प्रदर्शित करण्यात यावे.
5. वाहन प्रवास न करता उभे असल्यास प्रत्येक तासाकरीता वरील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे प्रतिक्षा दर लागू रहातील (रकाना 5 चे अवलोकन करावे.)
6. प्रस्तावित केलेल्या कमाल भाड्यापेक्षा जास्त भाडे आकारता येणार नाही.
7. रुग्णवाहिकेला GPS प्रणाली आसने आवश्यक राहिल.
8. प्रत्येक फेरी नंतर निर्जतुकीकरण करणे आवश्यक आहे.
9. मोटार वाहन कायदा व त्यातील तरतुदीनुसार वेळोवेळी लागू होणारे नियम व अटी लागू रहातील.
10. सर्व रुग्ण वाहिका वातानुकुलीत असल्याचे ग्राहय आहे. तसेच आवश्यकतेनुसार किंवा रुग्णाच्या विनंतीनुसार वातानुकुलीत यंत्रणा चालु अथवा बंद ठेवता येईल.

प्राधिकरणाच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर

| | मान्य | अमान्य | सही |
|---|---|---|---|
| मा. अध्यक्ष<br>प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा<br>जिल्हाधिकारी, पुणे | ✓ | | [signature] |
| मा. सदस्य<br>प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा<br>पोलिस उप आयुक्त वाहतूक, पुणे | ✓ | | [signature] |

सचिव
प्रादेशिक परिवहन प्राधिकरण तथा
प्रादेशिक परिवहन अधिकारी,

Scanned with CamScanner